महाराष्ट्र टाइम्स
www.maharashtratimes.com

# हायटेक मसापचे ई-बुक

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

## खास लहान मुलांसाठी 'ई- निरागस' चे प्रकाशन



लहान मुलांच्या प्रतिभेच्या भावविश्वाला वाव मिळावा म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे पुढाकार घेऊन ई-निरागस हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध करण्यात आले आहे. परिषदेतर्फे प्रकाशित करण्यात आलेले हे पहिले ई-बुक ठरले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद आता हायटेक होते आहे. त्याअंतर्गत ई- बुक हा उपक्रम प्रथमच राबविण्यात आला आहे. पुण्यात झालेल्या साहित्य संमेलनासाठी मसापला ८२ लाख रुपयांचा निधी मिळला होता. या रक्कमेचा विनियोग करण्यासाठी मसापतर्फे विविध साहित्यिक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

'संवेदना दिवाळी अंक, युवा संमेलन, मसापवरील माहितीपट, भारतीय भाषा स्त्रीवाद या पुस्तकाचे संशोधन हे उपक्रम परिषदेतर्फे हाती राबविण्यात येत आहेत,' अशी माहिती परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

परिषदेतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या संवेदना या दिवाळी अंकासाठी लहान मुलांकडून मोठ्या प्रमाणावर साहित्य आले होते. मात्र, त्यातील मोजक्याच लेखनाला प्रसिद्धी देण्यात आली. लहान मुलांकडून वारंवार त्यांचे साहित्य कधी प्रकाशित होणार आहे, याबाबत विचारणा करण्यात येत होती.

' संवेदना दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविलेल्या लहान मुलांच्या लेखनात अनेक प्रकारचे वैविध्य होते. मुख्य म्हणजे त्यांच्या लेखनात कुठेही कोणाची कॉपी करण्यात आलेली नव्हती. एरवी मोठ्या लोकांच्या लक्षातही येणार नाहीत असे विषय सुद्धा त्यांच्या लेखनात होते. लहान मुले निराश होऊ नयेत, तसेच त्यांच्या लेखनालाही प्रसिद्धी मिळावी म्हणून हे सर्व साहित्य प्रकाशित करण्याचा निर्णय घेण्यात आला,' असे परिषदेचे प्रमुख कार्यवाह जोशी यांनी सांगितले.

हे सर्व साहित्य ई- बुक स्वरुपात प्रकाशित करण्यात आले आहे. बुकगंगाचे धनंजय दातार यांच्या सहकार्याने हे ई-बुक प्रकाशित करण्यात आले आहे. तर निलिमा गुंडी यांनी या पुस्तकाचे संपादन केले आहे.

पुस्तकाची किंमत भरून वाचक बुकगंगाच्या वेबसाइटवरुन हे पुस्तक डाऊनलोड करून घेऊ शकतात. या पुस्तकाची किंमत ५० रुपये आहे. परिषदेच्या कार्यालयातही वाचकांना हे पुस्तक मिळू शकेल, अशी माहिती जोशी यांनी दिली.

परिषदेतर्फे मोठ्या वाचकांसाठी महाराष्ट्र साहित्य पत्रिका प्रकाशित करण्यात येते. मात्र, लहान मुलांसाठी कोणतेही साहित्य प्रकाशित केले जात नाही. ही बाब लक्षात घेऊन लवकरच परिषदेतर्फे लहान मुलांसाठी त्रैमासिक काढण्यात येणार असल्याचे जोशी यांनी सांगितले.